divyamarathi.com

# चाळीसगाव स्थानकावर जलद गाड्यांना थांबा द्या

## रयत सेनेतर्फे खासदार ए.टी.पाटील यांना निवेदन




**खासदार ए. टी. पाटील यांना निवेदन देताना पदाधिकारी.**

**प्रतिनिधी । चाळीसगाव**

तीन वर्षांपासून चाळीसगाव रेल्वेस्थानकावर जलद गाड्यांना थांबा मिळावा, यासाठी रयत सेनेच्यावतीने डी.आर. एम तसेच जी. एम. भुसावळ यांना अनेकदा निवेदने देण्यात आली. परंतु वारंवार पाठपुरावा करून देखील रेल्वे प्रशासन या मागणीकडे लक्ष देत नसल्याने बुधवारी दि. २२ रोजी खासदार ए. टी. पाटील व आमदार उन्मेष पाटील

या रेल्वे गाडीला गोंदिया- सोलापूर दोन आरक्षित बोग्या सुरू कराव्यात म्हणून २०१३ साली चाळीसगाव रेल्वे स्थानकावर डीआरएम यांना निवेदन देण्यात आले. त्याच प्रमाणे जी. एम. भुसावळ यांना २०१४ रोजी चाळीसगाव रेल्वे स्थानकावर निवेदने दिली आहेत. तसेच रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा म्हणून पुन्हा २०१५ व २०१६ रोजी रेल्वे प्रबंधकांना निवेदने दिली आहेत. प्रवाशांचे मोठ्याप्रमाणात हाल होत

यांना भारत पच रयत सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.

११०९४ अप. ११०९३ डाऊन महानगरी एक्सप्रेस तसेच १२७१६ अप १२७१५ डाऊन सचखंड एक्सप्रेस या रेल्वे गाड्यांना चाळीसगाव रेल्वेस्थानकावर थांबा मिळावा, तसेच भुसावळ पंढरपूर नवीन रेल्वे गाडी सुरू करावी, त्याच प्रमाणे गोंदिया- कोल्हापूर महाराष्ट्र एक्सप्रेस असताना दुर्लक्ष रेल्वे प्रशासनाने याबाबत कोणत्याही प्रकारची ठोस भूमिका घेतली नाही. निवेदनावर रयत सेना संस्थापक अध्यक्ष गणेश पवार, जिल्हाध्यक्ष संजय कापसे, प्रदेश संघटक पप्पू पाटील, प्रदेश सचिव प्रमोद वाघ, प्रदेश समन्वयक पी.एन. पाटील, शेतकरी सेना तालुकाध्यक्ष दीपक राजपूत, बंटी पाटील, दत्तू पवार आदी उपस्थित होते.